# एड्स आणि भारतीय समाज - एक विश्लेषणात्मक अध्ययन

**प्रा. सिद्धार्थ पाटील** श्री. धाबेकर कला महाविद्याल खडकी (चां.) ता.जि. अकोला
**प्रा. अमरिष गावंड** श्री. धाबेकर कला महाविद्याल खडकी (चां.) ता.जि. अकोला

---

**प्रस्तावना :** १ डिसेंबर एड्स दिन म्हणून पाळल्या जातो आधुनिक काळात समाजाच्या अस्तीत्वाकरीता मोठा धोका म्हणून पुढे आलेला हा आजार अतिशय झपाट्याने संपूर्ण जागावर आपले वर्चस्व निर्माण करत आणि समाजाचे अस्तीत्व धोक्यात आले असल्याचे दिसून आले. म्हणून सर्व जगात एड्स या आजारावर नियंत्रण मिळविण्याकरीता प्रयत्न होतांना आपणास दिसतात. भारत हा विविधत असणारा देश असल्यामुळे कोणत्याही प्रकारचे उपक्रम किंवा योजना राबवितांना अडचणी येतात ही बाधा एड्स संदर्भात जनजागृती करतांना येत असल्याचे दिसून येते. साधारणत: जगात ३५.३ कोटी लोक एड्स संक्रमित असून प्रत्येक तासाल ५० महिला एचआयव्हीचे संक्रमण होते आणि १६ लाख लांकांचा मागील वर्षी एड्सने मृत्यु झाला तर २.६ लाख मुले दर वर्षी एड्स संक्रमित होतात. देशात अंदाजे २३ लाख लोक एड्सने संक्रमित असून १५ वर्शाखालील ७ टक्के मुले एड्सने बाधीत असून ८६ टक्के संक्रमित लोक हे १५-४९ वर्ष वयोगटातील असून त्यातील ३९ टक्के महिला आहे. या वरुन या आजाराच्या भयनकतेचे स्वरुप लक्षात येते. एड्स आज विकासात्मक समस्येपैकी एक समस्या बनली असून यावर वेळीच नियंत्रण प्रस्थापीत करणे आवश्यक आहे. AIDS या शब्दाच्या विश्लेषणावरुन आपणास या रोगाचा अर्थ अधिक स्पष्टपणे लक्षात येतो त्यानुसार

A - (Acquired) I - (Immune) D - (Deficiency) S -( Syndeome )

अर्थात प्रतिकार शक्तीच्या कमतरतेमुळे शरीराची हानी आणि हा रोग HIV या विषाणूमुळे होतो त्याचा अर्थ मानवी शरीरातील प्रतिकार शक्ती कमी करणारा विषाणू असा होतो आणि या विषाणूच्या संसार्गामुळे मानवाच्या शरीरातील प्रतिकार शक्ती कमी होते आणि तो विविध प्रकारच्या आजारांना बळी पडतो. एड्स असणारा व्यक्ती खोकला, ताप, क्षय, वजन कमी होणे, अंगावर गाठी येणे अशा नानाविधी आजाराने ग्रस्त असतो. त्याचा परीणाम कालांतराने मृत्युत होतो निश्चित उपचार नसणारा हा आजार व्यक्तीच्या मृत्युवरच थांबतो. आज जगभ्रात अनेक देशामध्ये या आजारावर संशोधन सुरु असुन अजुन आवश्यक असणाऱ्या निष्कर्षा पर्यंत संशोधकांना यश प्राप्त झाले नाही.

**एड्स संसर्गाची सामान्य लक्षणे**

१) सर्वसामान्य लक्षणे : वजनात घट, बालकांमध्ये नैसर्गिक वाढ खुंटणे, सतत ताप, भूक मंदावणे, अशक्तपणा.

२) पचनसंस्थेवरील परिणाम : हगवण, पोटदुखी, गिळण्यास त्रास, संडासच्या जागी दुखणे.

३) श्वसनसंस्थेवरील परिणाम : सतत खोकला, दमा, बेडक्यात रक्त पडणे, टी.बी., क्षयरोग.

४) मज्जासंस्थेवरील परिणाम : तीव्र डोकेदुखी, दृष्टि मंदावणे, हातपायावरील वातवाहीन्यावर परिणाम, फिट्स येणे, मेंदूवर परीणाम (स्मरणशक्ती, थरथरी, पायातील ताकद कमी होणे, वागणुकीत परीणाम).

५) बुरशीजन्य संसर्ग : तोंडात पाढरे चट्टे येणे, अन्ननलिकेमध्ये संसर्ग होणे.[१]

**अध्ययन पद्धती :**सामाजिक शास्त्राच्या अर्तगत आज अनेक समस्या संदर्भात वैज्ञानिक होतांना दिसून येते कारण सामाजिक शास्त्रात सामाजिक समस्यांच्या अध्ययना संदर्भात अनेक पद्धती अस्तित्वात आहेत त्यामुळे विज्ञानाच्या कसोट्यांची पूर्तता सामाजिक शास्त्रात केली जाते त्याचा परीणाम आज सामाजिक समस्या कमी करण्यास मोठ्या प्रमाणात यश येत असल्याचे दिसून येते. प्रस्तूत शोध निबंधामध्ये वैज्ञानिक पद्धतीने तथ्य संकलीत करण्यात आले आणि वैज्ञानिक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. संशोधन कार्यामध्ये वास्तविक तथ्यांचया संकलनास विशेष महत्व आहे कारण संशोधनाची सत्यता तथ्यसंकलनावर अवलंबून आहे. तथ्यासंदर्भात प्रसिद्ध विचारवंत फेअर चाईल्ड म्हणतात, "तथ्य ही एक अशी घटना आहे की, जिच्या निरीक्षण आणि मापनाच्या विषयाबाबत सर्वांमध्ये अधिक प्रमाणात सहमत आढळून येते."[२] अर्थात तथ्य अशी घटना आहे की, जी वास्तविक रुपात घडलेली आहे किंवा बहुतांश अंशी ज्यामध्ये सत्यता असल्याचे दिसून येते. सामाजिक शास्त्रात तथ्य हे सर्वासामान्य निष्कर्षमधुन निश्चित होत असतात. संशोधनामध्ये तथ्यांचे वैज्ञानिक पद्धतीने संकलन करण्यात येते. प्रस्तूत शोध निबंधामध्ये द्वितीयक तथ्य संकलनाच्या पद्धतीचा वापर करुन तथ्य संकलीत करण्यात आले आहेत. द्वितीयक तथ्या संदर्भात लुंडबर्ग हे म्हणतात, "शिलालेख, स्तूप, उत्खनातून सापडलेले मानवी सापळे, भौतिक वस्तू इत्यादी ऐतिहासीक स्त्रोतातून प्राप्त तथ्य द्वितीयक तथ्य असतात."[३] संकलनामध्ये संशोधन कर्ता स्वत: अध्ययन क्षेत्रात न जाता पूर्वी समस्येसंदर्भात असणाऱ्या माहीतीच्या अधारे तथ्य संकलित करत असतो. प्रस्तूत शोध निबंधामध्ये पुस्तके, रेकार्ड, वर्तमान पत्रे, साप्ताहीक, प्रकाशित लेख, स्वचरित्रे, संशोधन सेस्थेचे अहवाल इत्यादीच्या साहाय्यने तथ्य संकलित करण्यात आले आहेत. तथ्य संकलन करतांना पूर्णपणे वैज्ञानिकता पाळण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**शोध निबंधाचे उद्देश :**कोणत्याही संशोधानामध्ये योग्य आणि वस्तुनिष्ठ निष्कर्ष प्राप्त होण्यासाठी शोध निबंधाचे उद्देश निश्चित असण आवशयक आहे. प्रस्तूत शोध निबंधाचे काही मुख्य उद्देश पुढील प्रमाणे

१) एड्सचा वास्तविक अर्थ स्पष्ट करणे.

२) एड्सच्या संक्रमणाच्या वास्तविक कारणांचे विश्लेषण करणे.

३) एड्सच्या भयानकतेचे स्वरुप विश्लेषीत करणे.

४) भारतातील एड्सच्या समस्येचे अध्ययन करणे.

५) एड्स निमुर्लनाचे उपाय स्पष्ट करणे.

**एड्स भारतीय समाजासमोरील समस्या :** एड्स ही जागतिक स्तरावर विधवंस करणारी समस्या असून जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार १९९६ मध्ये २.२६ कोटी असणारी एड्स संक्रमित लोकांची संख्या २०१३ मध्ये ३५.३ कोटी पर्यंत गेली आहे.[४] यावरुन आपणास एड्स समस्येचे भयावह चित्र लक्षात येते. साथीच्या रोगाच्या प्रसारापेक्षा भयनक प्रसारीत होणारा हा आजार जागा समोर लोकसंख्या टिकविणारे आवाहन अभे करणारा आहे. एड्सचा प्रसार होण्यासाठी अनेक वाटा असल्यामुळे एड्स दिवसागणीक विनाशकारी स्वरुप धारण करत असून यावर योग्य पाऊल उचलणे आवश्यक आहे. प्रसिद्ध एड्सतज्ञ ख्रिस्तोफर विल्स यांनी भारतातील एड्सचे अध्ययन केले त्यांच्या मते, भारतात दर हजार पुरुषामगे सात लोकांची एड्सची चाचणी पॉझीटिव्ह आहे.भारताने एड्सविरोधी उपाय ताबडतोड अंमलात आणले नाही तर भारतातील काही तरुण पिढ्या उद्ध्वस्त होतील.[५] अन्य राष्ट्रांच्या तुलनेत भारतात एड्सच्या समस्येवर नियंत्रण प्रस्थापित करणे अवघड कार्य आहे. भारतात अनेक प्रकारची विविधता असुन सामाजिक व्यवस्थेत अनेक दृष्टिकोन आणि विचारसरणी असणारे लोक राहतात. अंधश्रद्धा, अज्ञान, परंपरावादी दृष्टिकोन, सामाजिक प्रतिष्ठा, अशा भ्रामक संकल्पनांचा पगडा असल्यामुळे एड्स समस्या भारतासमोरील महत्वाचे आवाहन आहे. आजही भारतात जनजागृतीचा अभाव असल्यामुळे परंपरागत पद्धतीनेच औषधोपचार करतांना दिसून येतात त्याचा परीणाम एड्स सारख्या आजाराची लागण तिव्र गतीने होतांना दिसून येते. आजही ग्रामीण भागातील लोक एड्स संदर्भात आवश्यक असणारी काळजी घेतांना दिसत नाही किंवा उपाययोजनांना प्रतिसाद देतांना दिसत नाही म्हणून एड्स निर्मुलन भारतातील प्रमुख समस्या बनली आहे. आज भारतात जवळपास २४ लाख लोक एड्सग्रस्त आहे आणि ५० महिलांना दर तासाल एड्स होतो व मागील वर्षी १६ लाख लोक एड्समुळे मृत्युमुखी पडले व २.६ लाख मुले दरवर्षी एचआयव्हीच्या संक्रमणाचे बळी पडतात.[६] यावरुन आपणास एड्सच्या समस्येची भयानकता दिसून येते.

**भारतातील एड्सची वर्तमान स्थिती :** १ डिसेंबर रोजी जागतिक एड्स दिन साजरा करण्यात आला या दिवशी शून्य गाठावयाचा आहे : शून्य भेदभाव, शून्य संक्रमण, एड्समुळे होणारे शून्य मृत्यु अशी एड्स दिनाची संकल्पना आहे. भारतातील एड्स संदर्भात असणारी यशस्वी वाटचाल शून्य गाठणारे असून या संदर्भात पुढिल माहीती अधीक समर्पक दिसून येते.

| वर्ष | रुग्ण तपासणी | एचआयव्ही पॉझीटिव्ह | खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २००२ | २२६ | ५७ | ५६,५०० | २५.२२ |
| २००३ | १०६१ | २७३ | २,६५,००० | २५.७३ |
| २००४ | १७१७ | ३१९ | ४,२९,२५० | १८.५८ |
| २००५ | १८०६ | ३०३ | ४,५१,००० | १६.७८ |
| २००६ | २००८ | ४०८ | ५,०२,००० | २०.३२ |
| २००७ | ९०३४ | १०६८ | २२,५८,००० | ०१.८२ |
| २००८ | २६९२९ | ६३८ | ६७,३२,२५० | २.३६ |
| २००९ | ३५६५३ | ८४३ | ८९,१३,२५० | २.३६ |
| २०१० | ३८७५३ | ८५७ | ९६,८८,२५० | ०२.२१ |
| २०११ | ६१४५६ | ६७८ | १,५३,६४,००० | ०१.०१ |
| २०१२ | ७१५२१ | ६०७ | १,७८,८०,२५० | ०१ |
| २०१३ | ६२१७ | १०५ | १५,५४,२५० | ०.१ |

**स्त्रोत : दैनिक लोकमत, शहर विशेष रविवार दिनांक १ डिसेंबर २०१३**

२००२ साली २५.२२ टक्के असणारे रुग्णांचे प्रमाण २०१३ साली प्रमाण केवळ १ टक्का असून भारताची शून्य लक्ष्याकडे वाटचाल असल्याचे निर्देश आहे. महाराष्ट्राचा विचार करता पाच वर्षापूर्वी ७.१५ टक्के लोक एड्सग्रस्त होते आणि यावर्षी हे प्रमाण १.८३ वर आले आहे.[७] महाराष्ट्रासह भारतात झालेली व्यपक प्रमाणात जनजागृती, शासन स्तरावरील प्रभावी प्रयत्न, वैद्यकिय यंत्रणा, सामाजिक संस्था व जनतेचे आणि मान्यवरांचे सहकार्य यामुळे एड्सचा शून्य गाठण्याकडे प्रशंसनीय वाटचाल सरु असल्याचे दिसून येते. प्रगत वैद्यकीय तंत्रज्ञान,समुपदेशन, एड्स बद्धल जनजागृती करण्यासाठी प्रयत्न याच्या परीणामामुळे २००७ मध्ये १०.६५ टक्के एचआयव्हीसह जगणाऱ्यांचे प्रमाण २०११ मध्ये ५.८४ टक्के राहीले.[८] या तूनही भारताची एड्स नियंत्रणासंदर्भात वाटचाल उल्लेखनिय असलेली दिसून येते.

**एड्स निमृर्लनासाठी कार्यरत असणाऱ्या संस्था :** २०११ साली ४३ संस्था एड्स संदर्भात जनजागृती करणाऱ्या होत्या आणि वर्षागणिक त्यामध्ये वाढ झालेली निदर्शनास येते. आज भारतातही अनेक स्वयंसेवी संस्था एड्स निमृर्लनासाठी कार्य करत असून त्यांना प्राप्त होणारे यश वाखण्यासारखे आहे. वर्तमान स्थितीत भारतात

१) अखिल बुधवार पेठ देवदासी संस्था
२) प्रोजेक्ट कन्सर्न इंटरनॅशनल/इंडीया (पी.सी.आय.)
३) टेक्स्ट टु चेंज (टीटसी)
४) पहेल
५) सहेली प्रकल्प
६) वेक-अप पुणे
७) एड्स च्या जनजागृतीसाठी झटणारी चिमुकली

अशा विविध संस्था कार्यरत असून त्याच्या कार्याचा भरीव परीणाम आपणास पाहावयास मिळतात. आज भारत जागतिक स्तरावर एड्स सारख्या महत्वाच्या समस्यांना कमी करण्यामध्ये नेतृत्व करतांना याच संस्थाच्या प्रयत्नामुळे दिसून येत आहे.

**संक्षिप्त निष्कर्ष :** १) एड्स मानव समाजाल नष्ट करणारा आजार आहे.
२) भारतात असणारी विविधता, अंधश्रद्धा, रुढीवादी विचार, कौटुंबिक स्तरावरील संकोचीत विचार एड्स प्रसारासाठी महत्वाचे करण आहे.
३) अचुक उपचाराच्या शोधाचा अभाव एड्स समस्या कमी करतांना बाधा निर्माण करतात.
४) जागतिक आणि सामाजिक स्तरावर विचारामध्ये व्यपकता आणि स्पष्टता निर्माण करणे आवश्यक आहे.
५) अपर्याप्त जनजागृती आणि लोकांचा अल्प प्रतिसाद एड्स निमुर्लनामध्ये अडथळा निर्माण करतात.
६) भारतातील एड्सची वर्तमान स्थिती जगाच्यातुलनेत प्रशंसनीय असली तरी शून्य एड्सग्रस्त गाठण्याकरीता प्रभावी प्रयत्नांची आवश्यकता आहे.
७) एड्सग्रस्तांची संख्या कमी करण्यासाठी शरीर संबंधांना मान्यता देणे हितवाह ठरेल.
८) एड्सग्रस्ताविषयी संदर्भात समाजाचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ सूचि :**

१) उन्हाळे राजीव, एड्सला जाणून घ्या, साकेत प्रकाशन प्रा.लि. ११५, म. गांधीनगर, स्टेशनरोड, औरंगाबाद- ४३१००५, पृ.क्र. २७
२) आगलावे प्रदिप, सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे,श्री. साईनाथ प्रकाशन १, भगवाघर कॉम्लेक्स धरमपेठ, नागपूर १० तिसरी आवृत्ती, पृ क्रं. २०८
३) तत्रैव, पृ.क्र. २१२
४) जोशी आनंद व शिधये श्रीराम, एड्सचा भोवरा,राजहंस प्रकाशन,१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० पृ.क्र.१
५) तत्रैव, पृ. क्र. १
६) दैनिक दिव्य मराठी, दिनांक १.१२.२०१३
७) तत्रैव १.१२.२०१३
८) ई- सकाळ, एड्सचे प्रमाण घटले आहे, ३० नोव्हेंबर २०११,मंबई
९) एड्स सूत्र, संपादन निगार आखणी, साकेत प्रकाशन प्रा.लि., गांधीनगर, स्टेशन रोड, औरंगाबाद
१०) http://aidssupport.aarogya.com/marathi